# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

**ग्राहक तक्रार क्र. २०/२०१३** **दि. २४.०५.२०१३**

| | |
|---|---|
| **१) सौ.स्मिता दिपक कदम**<br>**मु.पो. पन्हाळे,तर्फे सौंदळ**<br>**ता. राजापुर, जि. रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **१) कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**स व सुं विभागीय कार्यालय**<br>**रत्नागिरी.** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. डि. एस्. जामखेडकर**<br>**अध्यक्ष**<br>**२) श्री. व्ही. बी. जगताप**<br>**कार्यकारी अभियंता व सचिव** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **सौ. स्मिता दिपक कदम.**<br>**श्री. दिपक सिताराम कदम (प्रतिनिधी)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. ओंकार कि. बारापात्रे**<br>**उपकार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग.**<br>**२) श्री. अशोक वाय. कोंडगुळे**<br>**सहाय्यक अभियंता रत्नागिरी विभाग.** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

---

सौ. स्मिता दिपक कदम, मु.पो. पन्हाळे, तर्फे सौंदळ, ता.राजापूर यानी त्यांच्या पंपाच्या नवीन कनेक्शनबाबतची तक्रार मंचाकडे दि. २४.०५.२०१३ रोजी अर्जाच्या विहीत नमुन्यामध्ये सादर केलेली आहे तक्रार प्राप्त होताच मंचाचे पत्र क्रं १२१ दि. २८.०५.२०१३ अन्वये कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय रत्नागिरी यांचेकडे स्पष्टीकरण मागण्यात आले. आयोगाच्या नियमावलीनुसार सुनावणीची नोटीस काढून दि. १८.०६.२०१३ रोजी सुनावणी निश्चित केली होती पण कार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग यानी रत्नागिरी परिसरात पाऊस तसेच वादळ वा-यामुळे वीजवाहीन्यांची पडझड झालेली असल्यामुळे या सुनावणीस उपस्थित राहण्यास असमर्थता व्यक्त केली त्यामुळे पुन्हा ही सुनावणी दि. ०९.०७.२०१३ रोजी निश्चित करण्यात येऊन, सुनावणीची कार्यवाही पुर्ण केली. सुनावणी दरम्यान उभय पक्षानी उपस्थित राहून आपला युक्तीवाद सादर केला.

तक्रारदार सौ. स्मिता दिपक कदम यांच्या तक्रारीचे स्वरुप असे की, त्यांनी त्यांच्या शेतजमिनीसाठी पाच अश्वशक्तीचे वीज पंप कनेक्शन मिळणेसाठी दि. ०४.०७.२०११ रोजी अर्ज केला होता त्या अर्जास अनुसरुन महावितरणकडून पंपाच्या कनेक्शनची मंजूरी होऊन कोटेशन देण्यात आले, त्यानुसार सौ.कदम यानी कोटेशनची रक्कम रु. ५५७५/-दि. २९.०९.२०१३ रोजी महावितरणकडे भरली आहे. त्यानंतर मात्र ही वीज जोडणी मिळण्यासाठी त्यानी वेळो वेळी पाठपुरावा केला पण प्रत्येक वेळी मटेरिअल नाही, ठेकेदार नाही अशा सबबी सांगणेत आल्या. सदर कनेक्शन बॅकलॉग स्किममध्ये मंजूर झालेले असून जेष्ठता यादीनुसार हे कनेक्शन मिळण्यासाठी वेळ लागणार होता त्यामुळे त्यानी परत दि. ०५.११.२०११ रोजी अर्ज देऊन हे कनेक्शन बॅकलॉग ऐवजी Non DDF (C.C.R.F.) या स्किममध्ये मंजूर करुन ही वाहीनी त्या स्वतःच तयार करीत असल्याबाबत कळविले होते. त्यानुसार महावितरणकडून अंदाजपत्रक मंजूर झाले, पण त्याना देखील ही वाहिनी तयार करण्याकरीता ठेकेदार उपलब्ध न झालेमुळे मुळच्याच स्किम मध्ये (Back log) ही वाहिनी महावितरणनेच तयार करुन कनेक्शन देणेत यावे असा परत दि. २६.११.२०११ रोजी अर्ज दिला आहे, पण हा अर्ज देऊन आजतागायत जवळपास दिड वर्षाचा कालावधी झाला, पण कनेक्शन देण्यात आलेले नाही व ते लौकरात लौकर देण्याबाबत विनंती केली आहे.

महावितरणने आपल्या स्पष्टीकरणामध्ये नमुद केले आहे की अर्जदाराच्या प्रत्येक विनंती नुसार वेळोवेळी विहीत मुदतीत अंदाजपत्रक मंजूर करुन देऊन सहकार्य केलेले आहे सध्य स्थितीत परत एकदा अर्जदारानी त्यांच्या कनेक्शनच्या वाहीनीचे काम Ag.Backlog स्किम मध्येच पूर्ण करण्यासाठी कळविलेले आहे. त्यामुळे परत एकदा या स्किम मध्ये मंजूरी घ्यावी लागेल व त्यानंतर पुर्विच्याच जेष्ठता यादी प्रमाणे वीज कनेक्शन देता येईल. मे २०१३ अखेर अर्जदाराच्या जेष्ठता यादी क्रं.२२ असा आहे.

सुनावणी दरम्यान अर्जदाराच्या वतीने श्री.दिपक सिताराम कदम यानी युक्तीवाद केला. सुनावणीच्या दरम्यान त्यानी अर्जात नमुद केलेले मुद्देच परत मांडले व कनेक्शन लौकरात लौकर देणेबाबत विनंती केली तसेच तक्रारीबाबत खर्च किंवा आयोगाच्या नियमावलीनुसार झालेल्या विलंबाबाबत भरपाई अथवा दंड आकारण्याबाबत नकार दर्शविला.

महावितरणकडून श्री. ए.वाय्.कोंडगुळे सहाय्यक अभियंता रत्नागिरी विभाग व ओंकार के. बारापात्रे उपकार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग हे सुनावणीसाठी उपस्थित होते पैकी श्री. कोंडगुळे यानी आपला युक्तीवाद सादर केला. आपल्या युक्तीवादा मध्ये श्री. कोंडगुळे यानी स्पष्ट केले की ,हे कनेक्शन देण्यासाठी फक्त पाच पोल वरील सिंगल फेज वाहीनी तीन फेजची करावी लागेल व हे काम छोटेसे असल्यामुळे ही वाहीनी ताबडतोब तयार करुन घेऊन कनेक्शन देणेत येईल. अर्जदारांनी आपल्या वीज कनेक्शनच्या अंदाज पत्रकासाठी वेळोवेळी पर्याय बदलला होता त्यामुळे वेळ झालेला असून सध्या अर्जदारानी Backlog स्किम मध्ये काम करुन वीज कनेक्शन देण्याबाबत कळविले आहे. हे काम जरी छोटे असले तरी सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे वाहीन्यांची पडझड झालेली असते तसेच पावसाळयात ठेकेदार मिळत नाहीत तरी देखील गणेश चतुर्थी पर्यन्त म्हणजे सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयापर्यन्त वाहीनी तयार करणेत येईल असे नमुद केले.

या प्रकरणा मध्ये दाखल झालेली कागदपत्रे उभय पक्षाकडून करणेत आलेला युक्तीवाद या सर्वांचा विचार करता मंचानी असा निष्कर्ष काढला आहे की, अर्जदार सौ. स्मिता दिपक कदम यांच्या वीज पंपाचे कनेक्शन मिळणेसाठी वेळ लागलेला आहे ही वस्तुस्थिती आहे पण हा वेळ अर्जदारानी वेळोवेळी आपला पर्याय बदल्यामुळे झालेला आहे. तरी देखील ही वीजवाहीनी पुर्ण करण्याचे काम एकदम अल्प असल्यामूळे महावितरणने ते लौकरात लौकर पुर्ण करावे असे मंचाचे स्पष्ट मत आहे. सध्या या भागात पाऊस असल्यामुळे काम करण्यास अडचणी येतात ही महावितरणने नमुद केलेली वस्तुस्थिती रास्त आहे तरी देखील श्री. कोंडगुळे सहाय्यक अभियंता यानी हमी दिल्याप्रमाणे सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयापर्यन्त हे काम पुर्ण करुन कनेक्शन देणेत यावे असे मंचाचे मत आहे. अर्जदारानी खर्च किंवा अनुषंगिक बाबी करीता कोणताही मुद्दा मांडलेला नसल्यामुळे या बाबींचा मंचाकडून विचार करणेत येत नाही.

वरीलप्रमाणे नोंदविलेल्या निष्कर्षानुसार मंचाकडून खालीलप्रमाणे आदेश देणेत येत आहे.

# आदेश

**१) अर्जदाराची तक्रार मान्य करणेत येत आहे.**

**२) महावितरणने नमुद केल्याप्रमाणे अर्जदाराचे शेतीपंपाचे वीज कनेक्शन दि. ०७.०९.२०१३ पर्यन्त देणेत यावे व या बाबतचा पुर्तता अहवाल दि. १७.०९.२०१३ पर्यन्त मंचाकडे दाखल करावा. मात्र त्यानंतर होणा-या विलंबास महावितरण आयोगाच्या नियमावलीनुसार दंडास पात्र राहील.**

३) खर्च किंवा अनुषंगिक बाबीकरीता कोणताही आदेश नाही.

४) या आदेशाविरुध्द ग्राहकांस अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

**पत्ता :-**

सचिव,
लोकपाल महाराष्ट्र राज्य
विदयुत नियमक आयोग
६०६/६०८ केशवा बिल्डींग/
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुबंई ४०००५१
फोन नं. ०२२ / २६५२९६५

श्री. डी. एस्. जामखेडकर
अध्यक्ष
ग्रातनिमं कोकण परिमंडल रत्नागिरी

श्री. व्हि.बी.जगताप
कार्यकारी अभियंता व सचिव
ग्रातनिमं, कोकण परिमंडल रत्नागिरी

दिनांक :-२४.०७.२०१३
ठिकाण :- रत्नागिरी